Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६००४

Ph No. 0231-2696101/2696102/2696103 Email: divsec.kop@gmail.com

WebSite : www.sscboardkolhapur.in

**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/ माध्य.गोप /उ.प.तपासणी/ 3256

दिनांक : १५/०९/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा सातारा ,सांगली,कोल्हापूर

**विषय :** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] परीक्षा फेब्रुवारी/ मार्च २०२६ च्या परीक्षेस परीक्षक/नियामक नेमणुक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठविणेबाबत

उपरोक्त विषयांस अनुसरुन माध्यामिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेसाठी उत्तरपत्रिकांची तपासणी कामासाठी परीक्षक / नियामक नेमणूकीच्या अनुषंगाने आपणाकडून या पत्रान्वये प्राप्त झालेल्या शिक्षक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली शिक्षक माहिती / यादी या पत्रासोबत **दिनांक १८/०९/२०२५ रोजी वितरण केंद्रावर हस्तपोच** आपणास देण्यात येत आहे. त्यातील माहितीची पडताळणी करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे

1. यादीतील शिक्षकांचे संपूर्ण नाव (इंग्रजी स्पेलिंगसह) त्याचबरोबर शिकवित असलेले विषय आणि माध्यम इत्यादी सर्व माहिती बरोबर आहे का याची खात्री करावी
2. **आपल्या शाळेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व विषय शिक्षकांची नांवे सोबतच्या यादीत समाविष्ठ असणे आवश्यक असल्याने यासंदर्भात शाळाप्रमुख म्हणून सर्वस्वी मुख्याध्यापक जबाबदार राहतील.** यादीमध्ये एखाद्या शिक्षकाचे नाव समाविष्ठ नसल्यास ते समाविष्ठ करावे. तसेच तात्पुरत्या / तासिका तत्वावरील शिक्षकांचेदेखील संपूर्ण नावासह शिकवीत असलेला विषय, माध्यम, परीक्षक/नियामक टर्न, सेवानिवृत्ती दिनांक व मोबाईल नंबर, बँक खाते क्रमांक, IFSC Code इ. माहिती नोंदवून नावांसमोर संबंधितांची स्वाक्षरी घेण्यात यावी.
3. यादीतील शिक्षकांची आपल्या शाळेतून अन्य शाळेत बदली झाली असेल अथवा अन्य शाळेतून बदलीने आपल्या शाळेत नियुक्ती झालेल्या अशा शिक्षकांच्या नावासमोर बदली शाळेचे नाव व शाळा सांकेतांक **लाल शाईच्या पेनने** नोंदी कराव्यात.
4. एखादा शिक्षक एका पेक्षा अधिक विषय शिकवीत असेल तर कोणत्या विषयाचे पेपर तपासणेस हवे आहेत ते ठळकपणे नमूद करावे.
5. मे 2026 पूर्वी सेवानिवृत्ती होणारे विषय शिकवीत नसलेले तसेच अभ्यासमंडळ सदस्य , कॅन्सर/ हृदयरोग / टी.बी. अशा आजाराने पिडीत असलेल्या शिक्षकांच्या नोंदी ठळकपणे करणे आणि त्यासंदर्भात आवश्यक पुरावा जोडणे अनिवार्य आहे.
6. यापूर्वी प्रमुख नियामक [ C.M.] म्हणून काम केलेल्या शिक्षकांनी त्यांची परीक्षक/नियामक म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली असेल तर तसे त्यांच्या नावासमोर नोंद करावी. त्याचबरोबर एखाद्या शिक्षकांवर मंडळाकडून प्रतिबंधात्मक कारवाई केली गेली असल्यास तसा त्यांच्या नावांसमोर ठळक अक्षरात उल्लेख करण्यात यावा.

7. मुख्याध्यापक प्रशासकीय कारणाने उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. तथापि उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध शिक्षकांची संख्या विचारात घेता तसेच निकालाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार या सर्वांना परीक्षन/नियमनाचे काम करणे बंधनकारक राहिल.

8. प्रामुख्याने अंशतः अनुदानित/ विनाअनुदानित शाळाबाबत असे दिसून येते की, उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर ऐनवेळी संबंधित शिक्षक शाळा सोडून गेल्याचे सांगतात. ही बाब अत्यंत गंभीर असून अशावेळी उत्तपत्रिका तपासून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी मुख्यध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

9. **महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती १९८१ नियम २२[ १ ]अनूसूची [ अ] मधील ४ [ १८,१९] नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षा अनुषंगिक सर्व कामे अनिवार्य आणि बंधनकारक आहे. तसेच जाणीवपूर्वक शिक्षक माहिती न पाठविणे / उत्तरपत्रिका गठ्ठा न तपासणे/परत पाठविणे/ अपूर्ण माहिती पाठविणे अशा सर्व घटनांबाबत सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांवर राहिल.**

10. अनुदानित तसेच अंशत: विनाअनुदानित/विनाअनुदानित / स्वंयअर्थसहाय्यीत शाळातील सर्व शिक्षकांनी आपल्या नावासमोर योग्य त्या ठिकाणी **Teacher Type** बाबत ठळक अक्षरात तशी नोंद करावयाची आहे. (A/B/C/D पैकी)

**शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती**

इयत्ता १० वी ची लेखी परीक्षा **फेब्रुवारी/ मार्च २०२६** महिन्यात घेण्याचे निश्चीत केलेले आहे. तत्पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन करणेच्या दृष्टीने **शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक** विषय शिक्षकांची माहिती तथा स्वीकृती पत्र या सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू माहिती परीपूर्ण भरुन घेवून संबंधितांच्या स्वाक्षरीसह **परीक्षक/नियामक यादीसोबत** या कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

वरील सर्व सूचना तथा माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे त्यांच्या नावांसमोर स्वाक्षरी घेण्यात यावी. **वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती कोणत्याही परिस्थितीत शनिवार दिनांक २७/०९/२०२५ रोजी आपल्या वितरण केंद्रावर जमा करावयाची आहे.** काही शाळा मुख्याध्यापक ठराविक शिक्षकांची नावे जाणीवपूर्वक वगळून यादी सादर करत असल्याचे **या कार्यालयास निदर्शनास आले आहे. यापुढे कार्यरत शिक्षकांची नांवे वगळल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर म.खा.शा.क. (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयी कारवाई प्रस्तावित केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 15-09-2025 15:45:01

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

<u>सोबत:</u> विहीत शिक्षक माहिती (लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा )

**प्रत माहितीस्तव: <u>सर्व वितरण केंद्रप्रमुख</u> (सातारा/सागली/कोल्हापूर जिल्हा) - जमा झालेली स्वीकृती पत्रे तालुकानिहाय मंडळ कार्यालयात मंगळवार दिनांक ३०/०९/२०२५ रोजी न चुकता जमा करावयाची आहेत.**

D/PATIL 2/PANEL LETTER FOR MAR 2026